MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

International Multilingual Research Journal

Vidyawarta®

Special Issue, January 2018

# Constitutional Amendment's

Editor's

Dr. V. B. Bansode

Dr. R. J. Temkar

# Vidyawarta™

## International Multilingual Research Journal

Editors

Dr. V. B. Bansode

Dr. R. J. Temkar

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Govt. of India,
Trade Marks Registry
Regd. No. 2611690

**Note :** The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. 'Printing Area' dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute,academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary. Disputes, If any shall be decided by the court at **Beed** (Maharashtra, India)

**http://www.printingarea.blogspot.com**

# || Index ||

01) 73 th and 74th Constitutional Amendment and Maharashtra
**Harshvardhan S. Kolhapure, Latur** || 07

02) 73rd And 74th Constitution Amendments and Women
**Dr. Suresh Devare, Dr. Vilas Awari (HOD), Kopargaon** || 13

03) POLITICAL PARTICIPATION AND REPRESENTATION OF WOMEN IN INDIAN POLITICS
**Dr. Dudhkawade Suresh Ramji, Pune** || 15

04) Position of Women in Indian Society
**Dr. B. B. Tilekar, Ahmednagar** || 19

05) ७३ व ७४ वी घटनादुरुस्तीची २५ वर्षे : एक विश्लेषणात्मक आढावा
**प्रा. डॉ. विलास भारतराव बनसोडे, जि. अहमदनगर** || 23

06) ७३ वी, ७४ वी राज्यघटनादुरूस्ती आणि महिलांचे राजकीय सक्षमीकरण एक चिंतन
**प्रा.डॉ. भालेराव श्रीराम हनमंतराव, लातूर** || 26

07) ७३ व ७४ वी घटनादुरुस्ती व महिलांचा राजकीय सहभाग : वास्तव
**प्रा. डॉ. संजय वामनराव भोळे, शेंदुर्णी** || 29

08) महाराष्ट्रातील ग्रामीण राजकारण आणि महिलांचा सहभाग
**प्रा. डॉ. चंद्रकांत प्रभाकर काळे, जि. अहमदनगर** || 32

09) ७३ वी व ७४ वी घटनादुरूस्तीची समर्पकता
**प्रा. फलके अविनाश बी., जि.अहमदनगर** || 34

10) ७३वी व ७४वी घटनादुरूस्तीची समर्पकता
**प्रा. मिलिंद विठ्ठल खांदवे, तळेगाव दाभाडे** || 39

11) स्थानिक स्वराज्य संस्था आणि ७३, ७४वी घटनादुरूस्तीचे महत्त्व
**डॉ. बेग रेहानाआरा ईस्माइल, पाबळ** || 43

12) ७३व ७४व्या घटना दुरुस्तीची समर्पकता
**प्रा. डॉ. देशमुख सुभाष, श्री. तिजोरे महेंद्र, अहमदनगर** || 46

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

13) पंचायतराजची २५ वर्ष— अवलोकन व आव्हाने
घुले जिजाभाऊ सिताराम, नांदेड || 51

14) ७३ वी व ७४ वी घटना दुरुस्तीची समर्पकता
मोहन भानुदास परतवाघ, नांदेड || 55

15) ७३ वी व ७४ वी घटनादुरुस्ती व महिला सहभाग
प्रा. बाळासाहेब बनसोडे, जि. अहमदनगर || 59

16) ७३ वी घटना दुरूस्तीचे महत्व
प्रा. फुलारी अर्चना सुभाष, जि. अहमदनगर || 60

17) ७३ व ७४ वी घटनादुरुस्ती व महाराष्ट्रातील पंचायतीराज व्यवस्थेतील महिलाचा सहभाग
कु. कोमल भालेराव, जि. अहमदनगर || 62

18) ७३ वी घटना दुरूस्ती व पंचायत राज व्यवस्था
प्रा. अरूण महादेव राख, पाथर्डी. || 64

19) शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीतील राजकीय यशापयश
प्रा. डॉ किशोर गटकळ, नेवासा || 66

20) ७३ वी घटना दुरूस्ती — एक सामाजिक अविष्कार
प्रा. डॉ. राजकुमार पंढरीनाथ घुले, आदिनाथनगर || 70

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

14

# ७३ वी व ७४ वी घटना दुरुस्तीची समर्पकता

**मोहन भानुदास परतवाघ**
पीएच.डी. संशोधक,
स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड.

**********

प्रस्तावना :

भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून सत्तेचे व लोकशाहीचे विकेंद्रीकरण घडवून आणन्यासाठी केंद्र षासन, राज्यशासन आणि स्थानिक शासनाची निर्मिती करण्यात आली आहे. जोपर्यंत सर्वसामान्य व्यक्ती हा आपला राजकीय सहभाग सक्रिय नोंदविणार नाही तोपर्यंत राजकीय व्यवस्था गतीशिल होणार नाही. स्थानिक षासनातून लोकसहभाग वाढवून, स्थानिक नेतृत्वातून स्थानिकांच्या समस्या सोडविण्याचा एक यशस्वी प्रयत्न सध्या होत असताना दिसतो. आज स्थानिक शासनात महिलांना ५०% आरक्षण देण्यात आले आहे. तसेच स्थानिक शासनाकडे महत्वाचे विषय सोपविण्यात आले आहेत, की ज्यातून ते आर्थिक दृष्टया सक्षम होतील. वित्त आयोगाच्या माध्यमातून केंद्र व राज्यशासनाने आर्थिक दृष्टीकोनातून या स्थानिक शासनास मदत कशी करावी याची निश्चिती झाली आहे. आज स्थानिक शासन महत्वाच्या भूमिकेतून पुढे जात आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे ७३ वी व ७४ वी राज्यघटना दुरूस्तीची समर्पकतेतून शासनास प्राप्त झालेले अधिकार होय.

७३ वी व ७४ वी राज्यघटना दुरूस्ती होण्यापुर्वी स्थानिक राजकारणात समर्पकता नव्हती. श्खरा भारत खेडयातच आहे आणि तो सक्षम करण्यासाठी ग्राम स्वराज्याची आवश्यकता आहे.श असे महात्मा गांधीजी नेहमी सांगत असत. गांधीजीचे ग्राम स्वराज्याचे स्वप्न साकार करण्यासाठी भारतीय राज्यघटनेच्या ४० व्या कलमानुसार ग्रामपंचायती स्थापन करण्याचे अधिकार घटक राज्य सरकारकडे देण्यात आले. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्था हा विषय राज्यघटनेच्या राज्य यादीत समाविष्ट करण्यात आला. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे स्थानिक पातळीवर स्वंशासनाचा कारभार करणारी व्यवस्था होय. तिच्या माध्यमातून ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिशद या ग्रामीण पातळीवरील स्थानिक स्वराज्य संस्था होत. ग्रामीण पातळीवरील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या षासन पध्दतीला 'पंचायत राजा' असे म्हणतात. तर नागरी षासन संस्था म्हणून नगरपालिका, महानगरपालिका यांचा उल्लेख करावा लागतो.

राजकीय व्यवस्थेत जनतेचा जास्तीत जास्त सहभाग असणे लोकशाहीमध्ये आवश्यक असते. पण ७३ वी व ७४ वी घटना दुरूस्ती होण्या अगोदर जनतेचा सहभाग कमी प्रमाणात होता. कारण त्याकाळी लोक अशिक्षित होते, राजकारणाविषयी माहिती नव्हती, लोकांमध्ये उदासिनता होती. तसेच अनियमित होणा—या निवडणूका, षासनाचे अतिरिक्त नियंत्रण होते. ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी अपुरा निधी मिळत असे. उत्पन्नाची साधने कमी प्रमाणात होती. आणि काहीही कारण नसताना स्थानिक स्वराज्य संस्था बरखास्त करण्याची तत्कालीन राज्यष्शासनाची वृत्ती होती. अशा अनेक कारणांमुळे अनेक राज्यातील नागरी व स्थानिक स्वराज्य संस्था दुबळया बनलेल्या होत्या. याला महाराष्ट्र ही उपवाद नव्हता. राज्यशासनाच्या इच्छेप्रमाणे नागरी स्वराज्य संस्थांचा राज्यकारभार चालत असे. तेव्हा स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक स्वायत्तता व बळकटी मिळवून देंणे गरजेचे होते. स्थानिक व नागरी संस्थांच्या कारभारातील राज्यष्शासनाचा वाढता हस्तक्षेप थांबविणे आवश्यक होते. त्या दृष्टीने केंद्र सरकारने वेळोवेळी वेगवेगळया समित्या नियुक्त करून त्यावर उपाययोजना करण्याचे प्रयत्न सुरू ठेवले होते. १९७७ साली अशोक मेहता यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्ती केली होती. पंचायत राज्यव्यवस्था अधिक सक्षम व स्थिर करण्यासाठी या समितीने अनेक महत्वपूर्ण शिफारशी केल्या होत्या. परंतू तत्कालीन जनता सरकारचा १९७९ साली सत्तेवरून पायउतार

झाला आणि या समितीच्या शिफारशी तशाच राहिल्या. १९८६ साली तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांच्या प्रेरणेने एल. एम. सिंघवी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आली. या समितीने पंचायत राज्य संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त करून द्यावा आणि त्यांना घटनात्मक संरक्षण द्यावे अशी महत्वपूर्ण शिफारस केली होती. पण या शिफारसीही कागदावरच राहिल्या. यामुळे देशातील ग्रामीण व नागरी भागाचा विकास होवू शकला नाही. म्हणून ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी ७३ वी व ७४ वी राज्यघटना दुरूस्ती करण्यात आली.

७३ वी व ७४ वी राज्यघटना दुरूस्ती नंतर देशातील ग्रामीण व नागरी विभागात राजकीय घडामोडीत योग्य तो बदल झालेला आपणास दिसून येतो. २४ एप्रिल १९९३ पासून ७३ व्या राज्यघटना दुरूस्तीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला आहे. महाराष्ट्रामध्ये १९५८ च्या मुंबई ग्रामपंचायत आधिनियम आणि १९६१ च्या महाराश्ट्र जिल्हा परिशद व पंचायत स्थानिक स्वराज्य समिती कायदयाने ती अगोदरच सुरू झाली होती. संस्थांच्या कारभारामधे पूर्वीप्रमाणे राज्यष्शासन हस्तक्षेप व मनमानी करू शकत नाही. अनेकवेळा राज्यामध्ये शासन करणा—या राजकीय पक्षांना निवडणूक घेण्याकरिता अनुकूल परिस्थिती नसल्यास पंचायत राज संस्थांच्या निवडणुकींना मुदतवाढ देवून ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद नगरपालिका, महानगरपालिका यांच्या निवडणूका महाराष्ट्रात तब्बल १२ वर्षानंतर घेण्यात आल्या होत्या. पण आता या घटनादुरूस्तीमुळे दर ५ वर्षांनी निवडणूका घेतल्या जातात.

७३ वी व ७४ वी राज्यघटना दुरूस्तीच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य व नागरी संस्थांचा समर्पकपणे विकास करण्याच्या दृष्टीकोनातून काही तरतूदी करण्यात आलेल्या आहेत.

१. प्रत्येक गावात ग्रामसभा असेल ती राज्य विधीमंडळाने मंजूर केलेल्या ठरावानुसार अधिकार व कार्ये करील.

२. त्रिस्तरीय पंचायत राज यंत्रणा असेल तसेच ग्रामीण क्षेत्राचे शहरीकरण होत आहे त्यांच्यासाठी नगरपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका असेल.

३. स्थानिक स्वराज्य व नागरी संस्थाचे सदस्य प्रत्यक्ष मतदारांकडून निवडले जातील तसेच पंचायत समिती व जिल्हा परिशदेचे अध्यक्ष व नगर अध्यक्ष, महापौर यांची निवड अप्रत्यक्ष पध्दतीने होईल.

४. अनुसूचित जाती — जमातीसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा ठेवण्यात आला आहेत तसेच इतर मागासवर्गीयांसाठी २७% जागा राखीव असतील. महिलांसाठी ५०% जागा राखीव असतील.

५. पंचायत राज व नागरी संस्थांचा कार्यकाळ ५ वर्षांचा असेल.

६. या घटनीदुरूस्तीनुसार २४३ (ह) कलमात पंचायत व नागरी संस्थांना आपापल्या कार्य क्षेत्रातील लोकांवर कर बसविण्याचे, ते वसूल करण्याचे व त्याचा खर्च करण्याचा अधिकार देण्यात आला आहे.

७. ग्रामीण व नागरी संस्थांचा विकास करण्यासाठी वित्त आयोगाची दर पाच वर्शांनी राज्यपाल स्थापना करतात. या आयोगाच्या माध्यमातून आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी विविध उपाय योजना केल्या आहेत.

८. स्थांनिक व नागरी संस्थांच्या निवडणूका आयोगाकडून घेतल्या जातील. या तरतूदीच्या माध यमातून संपूर्ण देशांच्या ग्रामीण व नागरी भागाचा काया पालट होत आहे.

७३ वी व ७४ वी राज्यघटना दुरूस्तीनुसार विकासाच्या दृष्टीकोनातून जे समर्पक विषय आहेत त्या विषयाच्या माध्यमातून स्थानिक व नागरी संस्था ग्रामीण भागामध्ये सामाजिक न्याय आणि आर्थिक विकासाच्या कार्यक्रमात निर्णय घेण्याचे आणि अंमलबजावणी करण्याचे कार्ये पार पाडीत आहे. जनतेचा विकास करण्यासाठी पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, लहान पाटबंधारे, पाणलोट विकास क्षेत्र, जमीन सुधारणा, मृदा संधारण, इंधन, चारा, रस्ते, तळी, जलमार्ग, दळणवळणाची साधने, ग्रामीण विद्युतीकरण, दारिद्रय निर्मूलन, प्राथमिक शिक्षण, प्रौढ शिक्षण, ग्रंथालये, सांस्कृतिक कार्यक्रम जत्रा, बाजार, रूग्णालये, कुटुंब कल्याण, अनुसूचित जाती—जमातीचे कल्याण,

अपारंपारिक उर्जा स्त्रोत, व्यवसायीक शिक्षण, खादी उद्योग, अपंग व मतिमंद यांचे कल्याण, नागरी क्षेत्रांचे नियोजन, बांधकामाचे नियम, पर्यावरणाचे संरक्षण, दहनभूमी, दफनभूमी, जन्म—मृत्यू नोंद, दिवाबत्ती, सार्वजनिक सोई, अग्निशामक सेवा, बसथांबे, कोंडवाडा, पशूवरील अत्याचारांना लगाम इत्यादी विषयाच्या माध्यमातून स्थानिक व नागरी भागाचा योग्य तो विकास करण्याचे काम या राज्यघटना दुरूस्ती मुळे होत आहे.

७३ व्या व ७४ व्या राज्यघटना दुरूस्तीमुळे अनुसूचित जाती—जमातींना राखीव जागा आहेत तसेच सरपंच, सभापती, अध्यक्ष, महापौर व उपमहापौर ही पदे क्रमशः राखीव आहेत. महिलांना ५०% अरक्षण देण्यात आले आहे. ओ.बी.सी. ला २७% आरक्षण दिले आहे. या राज्यघटना दुरूस्तीच्या माध्यमातून ग्रामीण व नागरी संस्थांना घटनात्मक संरक्षण मिळाले आहे. राजकीय पक्षांच्या मनमानीला आळा बसला आहे. दर ५ वर्षाला निवडणूका घेतल्या जातात. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हापरिषद, नगरपंचायत, नगरपालिका, आणि महानगरपालिका यांच्याकडे कोणते विषय असावेत याची यादी राज्यघटनेतील ११ व्या आणि १२ व्या अनुसूचित देण्यात आली आहे. म्हणून ही राज्यघटना दुरूस्ती समर्पक मानली जाते. ग्रामीण भागाचा व नागरी भागाचा विकास झाला पाहिजे यासाठी वित्त आयोगाची स्थापना केलेली आहे. तसेच निवडणूका निःपक्षपातीपणे पार पडाव्यात म्हणून निवडणूकांची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाकडे सोपविली आहे. ७३ व्या व ७४ व्या घटना दुरूस्तीची जशी समर्पकता आहे. तशीच तिची असमर्पकता, अयोग्यता किंवा दोश सुध्दा आपल्याला जाणवतात. भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. इतिहास परंपरा, समाजरचना, भौगोलिक स्थिती, हवामान भिन्न स्वरूपाचे आहे. यामुळे केंद्र सरकारने एकाच प्रकारच्या ग्रामीण व नागरी संस्था निर्माण करण्याचा जो प्रयत्न केलेला आहे तो एकांगी व एक केंद्री वाटतो. राजकीय पक्ष आणि लोकशाही प्रक्रिया यांचे अतूट नाते विचारांत घेवून ही घटना दुरूस्ती होणे गरजेचे होते. परंतु या संदर्भात या राज्यघटना दुरूस्तीने राजकीय पक्षांच्या भूमिकेबाबत काहीही स्पष्टपणे म्हटलेले नाही. त्यामुळे अपक्ष व गटबाजी वाढीस लागली आहे. या राज्यघटना दुरूस्तीच्या माध्यमातून सत्तेचे विकेंद्रीकरण होणे गरजेचे होते. पण प्रत्यक्षात तसे घडले नाही. प. बंगाल केरळ व कर्नाटक यांचा अपवाद वगळता बाकी सर्व राज्यात घटनेतील २४३ (जी) या कलमाची अंमलबजावणी झाली नाही. असे असले तरी ७३ व्या व ७४ व्या राज्यघटना — दुरूस्तीमुळे भारतातील ग्रामीण व नागरी भागाचा समर्पक कायापालटच झालेला आपल्याला दिसून येतो

**संदर्भ सूची.**


१. भारतीय शासन आणि राजकारण — डॉ. अलका देशमुख श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर — २००९

२. महाराष्ट्र पासन आणि राजकारण — प्रा. बी. बी. पाटील. फडके प्रकाशन, कोल्हापूर — २००५

३. भारतीय शासन आणि राजकारण — डॉ. व्ही. एन. इंगोले, प्रा. व्ही. एल. एरंडे, कल्पना प्रकाशन नांदेड— १९९८.

४. महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण — अ. वा. वाईकर, निराली प्रकाशन, पुणे — १९९९.

५. स्थानिक प्रशासनः ग्रामीण व नागरी — डॉ. नारायण चौधरी, प्रा. अविनाश चौधरी, प्रा. सोपान मुसळे, य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक — २००९.


❑❑❑









**Published By**

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed-431 126
**(Maharashtra) Mob.09850203295**
E-mail: vidyawarta@gmail.com
**www.vidyawarta.com**

**ISSN-2319 9318**